RNI No. MAHBIL/2009/35526

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-क

वर्ष १२, अंक १२] गुरुवार ते बुधवार, एप्रिल ३०-मे ६, २०२६/वैशाख १०-१६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६.००

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, ज. टा. मार्ग,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०, दिनांक १५ एप्रिल २०२६.

वाचा.— (१) दि केरोसीन (रेस्ट्रिक्शन ऑन युज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.

(२) शासन पत्र क्रमांक रॉकेल-२०१८/प्र.क्र.१/ना.पु. २७, दिनांक १४ मे २०१८.

(३) क्रमांक निशि/केरो/ आठ/अधिसूचना/२०२६/जा. २५, दिनांक ४ मार्च २०२६.

(४) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांचा दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

अधिसूचना

क्रमांक निशि/केरो/आठ/अधिसूचना/२०२६/जा. ४३.— शासनाने वाचा क्र. २ च्या पत्रान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांच्याकडून सुधारित डेपो दर प्राप्त करून घेऊन त्याआधारे केरोसीनचे दर सुधारित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित केले आहे ;

ज्याअर्थी, सुधारीत एक्स-डेपो दराचा तक्ता सोबत पाठवून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील एक्स डेपो दरामध्ये दिनांक १ एप्रिल २०२६ पासून सुधारणा केलेली असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई यांनी या कार्यालयास वाचा क्र. ४ च्या ई-मेल संदेशाद्वारे कळविले आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या केरोसीनचा सुधारित कमिशनसह घाऊक व किरकोळ विक्री दर निश्चित करून त्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वाचा क्र. १ मध्ये नमूद तरतुदीस अनुसरून मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ एप्रिल २०२६ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे.—

अ.क्र. (१)	बाब (२)			सध्याचा दर (रुपये प्रति कि. लि.) (३)	सुधारित दर (रुपये प्रति कि. लि.) (४)
ए	एक्स-डेपो दर (रुपये प्रति कि. लि.)			५५६४१.००	५५६४१.००
बी	वस्तू व सेवा कर (जीएसटी) @ ५%			२७८२.०५	२७८२.०५
सी	घाऊक विक्रेत्यासाठी एकूण खरेदी किंमत [ए+बी]			५८४२३.०५	५८४२३.०५
डी	(*i*)	घाऊक विक्रेत्याचे कमिशन		१३४१.८८	१३४१.८८
	(*ii*)	तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता.		९९.००	१३९.१०
	(*iii*)	(A)	वाहतूक खर्च	२८०.७९	२८०.७९
		(B)	डिझेल व्यतिरिक्त अनुषंगिक बाबींचा खर्च	७०.२०	११२.३२
		(C)	डिझेलवरील खर्चात झालेली वाढ	१०४.२८	१०४.२८
			एकूण वाहतूक खर्च (A+B+C)	४५५.२७	४९७.३९
	(*iv*)	पथकर (Toll Tax)		७०.००	७०.००
	(*v*)	घाऊक वितरकांना पूर्णांकाचा लाभ		३.५६	८.२५
	(*vi*)	एकूण किंमत वाढ [डी (*i*) + डी (*ii*) + डी (*iii*) +डी(*iv*) + डी (*v*)]		१९६९.७१	२०५६.६२
इ	एकूण किंमत वाढीवर, वस्तू व सेवा कर (जीएसटी) @ ५% [डी (*vi*) च्या ५%]			९८.४९	१०२.८३
एफ	एकूण [सी + डी (*vi*) + इ] घाऊक विक्रीचा दर			६०४९१.२५	६०५८२.५०
एफ १	किरकोळ विक्रेत्यासाठी खरेदी किंमत			६०४९१.२५ ** (किंमत रुपये ५७६१०.७१ + वस्तू व सेवा कर रुपये २८८०.५४)	६०५८२.५० ** (किंमत रुपये ५७६९७.६२ + वस्तू व सेवा कर रुपये २८८४.८८)
जी	किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह)			६७५.००	१३५०.००
एच	किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तूटीच्या लाभांसह) वर टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) [जी च्या ५ टक्के]			३३.७५	६७५०
आय	किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लिटर)			६१२००** (किंमत रुपये ५८२८५.७१ + वस्तू व सेवा कर रुपये २९१४.२९)	६२०००** (किंमत रुपये ५९०४७.६२ + वस्तू व सेवा कर रुपये २९५२.३८)
जे	किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लिटर)			६१.२०	६२.००

शासन परिपत्रक क्रमांक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक-केईआर-१३७६/३७६९/१७, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पुर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.),
नियंत्रक, शिधावाटप व संचालक,
नागरी पुरवठा, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.